23-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/22/2025 9:48 PM Page 1



# सावईवेरे, वळवई भागात झाडे कोसळून घरांचे नुकसान


टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २२ :** मंगळवारपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या मान्सूनपूर्व पावसामुळे सावईवेरे आणि वळवई भागात जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

बुधवारी मध्यरात्री सुमारे १२ वाजता सावईवेरेतील कावंगाळ येथे देवानंद नाईक, विष्णुदास नाईक आणि गुरुदास नाईक यांच्या संयुक्त घरावर तानाडोचे एक मोठे झाड कोसळले. झाड थेट घरावर पडल्यामुळे घराचे छप्पर कोसळले आणि कौलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने, दुर्घटनेच्या वेळी घरात कोणीही उपस्थित नसल्यामुळे जीवितहानी टळली.

या घटनेनंतर स्थानिक पंच लोचन नाईक यांनी त्वरित घटनास्थळी भेट देऊन अग्निशामक दलाला माहिती दिली. सरपंच शोभा पेरणी यांनी देखील घटनास्थळी पाहणी केली. फोंडा अग्निशामक दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत झाड हटवण्याचे काम केले. गुरुवारी सकाळी तलाठी प्रितेश नाईक यांनी नुकसानग्रस्त घराची पाहणी केली.





दरम्यान, बुधवारी रात्री ९ च्या सुमारास वळवई ग्रामपंचायत क्षेत्रातील फोणचेभाट येथे प्रमोद धर्मू नाईक यांच्या घरावर आंब्याचे झाड कोसळल्याची दुसरी दुर्घटना घडली. झाडाच्या धडकेत घराचे मोठे नुकसान झाले असून, छप्पराच्या कौलांचे तुकडे प्रमोद नाईक आणि त्यांच्या पत्नीच्या अंगावर कोसळल्याने त्या किरकोळ जखमी झाल्या. त्यांना तातडीने बेतकी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून प्रथमोपचारानंतर घरी सोडण्यात आले.

ही दुर्घटना घडल्यानंतर माशेल येथे चालू असलेल्या फ्लडलाइट क्रिकेट स्पर्धेत सहभागी असलेले युवक तातडीने घटनास्थळी पोहोचले. फोंडा अग्निशामक दलाच्या जवानांच्या मदतीने झाड हटवण्यात आले, तसेच स्थानिक युवकांनी तातडीने छप्पर दुरुस्त केले आणि कौलांचा खच बाहेर काढला.

तलाठी प्रितेश नाईक यांनी गुरुवारी फोणचेभाट येथील घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पावसामुळे झालेल्या या दोन्ही घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले असून प्रशासनाकडून पंचनाम्याची प्रक्रिया सुरू आहे.

# आंब्याचे झाड कोसळून पाच वाहनांचे नुकसान

टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. २२ :** कळंगुट परिसरात जोरदार वाऱ्यासह झालेल्या अचानक पावसामुळे विविध ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. खोब्रावाडो, बागा आणि कळंगुट भागात एक मोठे आंब्याचे झाड कोसळून पाच वाहनांचे नुकसान झाले असून, यामध्ये पर्यटकांच्या वाहनांचाही समावेश आहे. याशिवाय उमटवाडा येथील एका घराचे छत उडून गेल्याचीही घटना घडली.



खोब्रावाडो येथे सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास जोरदार वाऱ्यामुळे एका आंब्याच्या झाडाच्या मोठ्या फांद्या अचानक कोसळल्या. त्या ठिकाणी पार्क केलेल्या पाच वाहनांवर या फांद्या कोसळल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पिळर्ण अग्निशमन केंद्राने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. या घटनेत एक कार पूर्णपणे चिरडली गेली असून, चार वाहनांना अंशतः हानी झाली आहे. या वाहनांमध्ये आंध्र प्रदेशातून आलेल्या एका पर्यटकाची कार व पर्यटक टॅक्सीचा समावेश आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आणि तत्परतेने इतर झाडाच्या फांद्या वेळीच हटवून पुढील नुकसान टाळण्यात आले.

पिळर्ण अग्निशमन केंद्रातील पथकात उपअधिकारी सनी फायडे यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन जवान विशाल पाटील, श्रीकांत सावंत, जितेंद्र बाली, प्रल्हाद कोटकर, साईराज मांद्रेकर, विदेश म्हापसेकर आणि चालक यांचा समावेश होता.

दरम्यान, उमटवाडा समुद्रकिनाऱ्याजवळील भागात जोरदार वाऱ्याचा फटका बसून विन्सेंट परेरा यांच्या घराचे पत्र्याचे छत उडून गेले. ही घटना रात्रीच्या सुमारास घडली असून, येथेही कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

यानंतर आणखी एक घटना वेरे–नेरुळ परिसरात घडली. नेरुळ पेट्रोल पंपाजवळील एका ठिकाणी झाड कोसळून कंपाऊंडच्या भिंतीवर आणि पार्क केलेल्या कार व स्कूटरवर पडले. या घटनेत दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

किनारपट्टी भागात हवामानातील अनपेक्षित बदलामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन स्थानिक प्रशासनाने केले आहे.

# गोव्यात दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत तपासणी शिबिरे

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** दिव्यांगजन सक्षमीकरण विभाग, राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालय आणि नियोजन, सांख्यिकी आणि मूल्यमापन संचालनालय यांनी भारत सरकारचा उपक्रम असलेल्या आर्टिफिशियल लिम्ब्स मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (अलिम्को) यांच्या सहकार्याने २० मे २०२५ रोजी सांगे तालुक्यात एक मोफत तपासणी शिबिर आयोजित केले होते. आवश्यक उपकरण–साधनांची गरज असलेल्या दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक यांना सक्षम बनवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येत अशलेल्या व्यापक राज्यव्यापी मोहिमेचा एक भाग म्हणून राज्यातील सर्व १२ तालुक्यांत अशी मोफत तपासणी शिबिरांचे आयोजन केले जात आहे.या शिबिराचे उद्घाटन दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचे मंत्री श्री. सुभाष फळदेसाई, राज्य दिव्यांगजन आयुक्त श्री. गुरुप्रसाद पावसकर; दिव्यांगजन सक्षमीकरण संचालक श्रीमती वर्षा नाईक यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाचे सचिव श्री. ताहा हाजिक यांच्यासह स्थानिक प्रतिनिधी व इतर मान्यवर उपस्थित होते.सांगे तालुक्यातील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी



दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचे माननीय मंत्री श्री. सुभाष फळदेसाई म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी सरकारची वचनबद्धता या उपक्रमातून प्रतिबिंबित होत आहे. दिव्यांग व्यक्तींच्या विशिष्ट गरजा जाणून घेणे आणि त्यांना सुलभपणे हालचाल करता येईल, काम करता येईल व त्याद्वारे त्यांना दैनंदिन जीवनात सहभाग वाढेल, प्रतिष्ठा वाढेल यासाठी आवश्यक साधन–उपकरणे उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट या शिबिरांमागे आम्ही ठेवले आहे.राज्य दिव्यांगजन आयुक्त श्री. गुरुप्रसाद पावसकर म्हणाले, सर्वसमावेशक आणि प्रवेशसुलभ गोवा निर्माण करण्याच्या दिशेने ही दिव्यंगत्व मूल्यांकन शिबिरे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहेत. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने आणि स्वातंत्र्याने जगण्याची संधी मिळावी, हे सुनिश्चित करणे आमचे ध्येय आहे. या शिबिरातून दिव्यांग व्यक्तींच्या गरजा ओळखण्यास मदत होते, त्याचबरोबर दिव्यंगत्व आणि सक्षमीकरण यातील दरी भरून काढण्यासाठी त्यांना वेळेवर मदत देणे आणि सहाय्यक तंत्रज्ञानाच्या आधारे आवश्यक साधने–उपकरणे उपलब्ध करून देणे याबाबतची आमची वचनबद्धताही ठळकपणे अधोरेखित होते.सांगे येथील शिबिरास लाभलेल्या प्रतिसादानंतर, २३ मे २०२५ रोजी कुडचडे येथे तिसरे तपासणी शिबिर होणार आहे.या शिबिरांचे आगामी वेळापत्रक खालीलप्रमाणे:* २२ मे – शासकीय विद्यालय, काणकोण* २३ मे – चेतना एज्युकेशन सोसायटी, कुडचडे* २४ मे – अवर लेडी ऑफ पाएटी हायस्कूल, कुळें, धारबांदोडा* २५ मे – फोंडा क्रीडा संकुल, फोंडा* २६ मे – फार्मसी कॉलेज, पणजी* २७ मे – संजय सेंटर स्कूल, वास्को* २८ मे – रवींद्र भवन, मडगाव* ३० मे – मॅरेज हॉल, वाळपई बसस्थानक परिसर, वाळपई* ३१ मे – सोहिरोबानाथ अंबिये महाविद्यालय, पेडणे* १ जून – पेडे क्रीडा संकुल, म्हापसा* २ जून – रवींद्र भवन, साखळी अलिमकोच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तींचे दिव्यंगत्व मूल्यांकन करणे आणि भविष्यात त्यांना आवश्यक व सहाय्यक उपकरणांचे वितरण सुलभ करण्याबाबत अलिमको महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. गोव्यातील दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान उंचावणे हा या उपक्रमामागचा हेतू आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीला आवश्यक साहाय्य निश्चित करण्याबाबतची गोवा शासनाची भूमिका या उपक्रमातून अधोरेखित होते.

# दूधसागरचे दरवाजे बंद!

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** गोव्यात मंगळवारपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर वनमंत्री विश्वजित राणे यांनी दूधसागर दरवाजे बंद करण्याची घोषणा केली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव धबधबे आणि उच्च जोखीम असलेल्या भागात जाऊ नका, असे आवाहनही मंत्र्यांनी पर्यटकांसाठी केले आहे.

दुधसागरचे दरवाजे पर्यटकांसाठी बंदच राहतील. कृपया इतर धबधब्यांमध्ये जाणे टाळा, कारण ते तीव्र प्रवाह, अचानक येणारे पूर आणि निसरड्या भूभागामुळे मोठे धोके निर्माण करू शकतात. परिस्थिती स्थिर होईपर्यंत या भागात ट्रेकिंग किंवा भेट देण्यापासून दूर रहा, असे मंत्र्यांनी सांगितले. मंगळवारी गोव्यात मुसळधार पावसामुळे भीषण पूर आला, रस्ते पाण्याखाली गेले, नाले ओसंडून वाहत होते आणि इमारती गळत होत्या ज्यामुळे अनेक लोक अडकले होते आणि त्यांना मदतीची नितांत गरज होती. राणे यांनी नागरिकांना भारतीय हवामान खात्याच्या सूचना, स्थानिक सूचना आणि आवश्यक त्या सर्व खबरदारी घेण्याचे आवाहन केले.

भारतीय हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे, ज्यामध्ये पुढील २४ तासांत राज्यात जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, वादळ आणि वादळी वारे ताशी ३० ते ७० किमी वेगाने वाहतील.

मान्सूनपूर्व पावसाच्या पहिल्या २४ तासांतच गंभीर पाणी साचल्याची नोंद झाली आहे, ज्यामुळे राजधानी शहरासह अनेक भागात पाणी साचले आहे.






# नऊ वर्षीय दृष्टिहीन मुलाने मांडवी नदी पार करत सादर केला सर्वसमावेशकतेचा नमुना

**स्विम इंडियाच्या पाठबळाच्या जोरावर बुऱ्हानुद्दिन हाजिकने चुलतभाऊ हमजा सोबत साध्य केली अनोखी कामगिरी**

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२:** साहस आणि सर्वसमावेशकतेचे एक उल्लेखनीय आणि प्रेरणादायी प्रदर्शन करताना, नऊ वर्षांचा दृष्टिहीन बुरहानुद्दीन हाजिकने त्याचा १६ वर्षीय चुलतभाऊ हमजा हाजिक याच्यासोबत यशस्वीरित्या मांडवी नदी पोहून पार केली. पणजीतील काम्पाल जलतरण तलावाचे वरिष्ठ प्रशिक्षक दयानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्विम इंडियाच्या पाठबळाच्या जोरावर त्याने ही असाधारण कामगिरी सादर केली.सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देणे आणि अडथळ्यांवर मात करणे शक्य असल्याचा विश्वास सादर करणे या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वसमावेशक खेळांच्या प्रसारामध्ये एक मैलाचा



दगड म्हणून कौतुक होत आहे.या कामगिरीचे सर्वच घटकांतून कौतुक होत असून, गोवा राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयद्वारेही त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी भारतीय पॅरालिम्पिक समितीचे सरचिटणीस जयवान जी.एच. आणि राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाचे सचिव श्री. ताहा हाजिक उपस्थित होते. अचडणींचा सामना करणे आणि आपली क्षमता प्रदर्शित करणे यासाठी योग्य व्यासपीठ तयार करण्याबाबतचे महत्व त्यांच्या उपस्थितीतून अधोरेखित झाली.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बोलताना, राज्य दिव्यांगजन आयुक्त कार्यालयाचे सचिव श्री. ताहा हाजिक म्हणाले की, सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देणारी यंत्रणा, भावंडांची ताकद आणि योग्य प्रशिक्षण हे घटक काय साध्य करू शकतात याचे नवे उदाहरण म्हणजे बुऱ्हानुद्दिनची ही कामगिरी आहे. आपण गृहित धरलेल्या मर्यादा ओलांडण्यासाठी ही कामगिरी दिव्यांग मुलांबरोबरच आपणा प्रत्येकाला प्रेरणा देत राहणार आहे.आपल्या या यशस्वी कामगिरीबाबत आनंद व्यक्त करताना नऊ वर्षीय जलतरणपटू बुऱ्हानुद्दिन हाजिक म्हणाला, मी कदाचित पाहू शकणार नाही, पण पाण्याची लय आणि पोहण्याच्या प्रत्येक स्ट्रोकमधील ताकद मला जाणवते. प्रशिक्षण हे सोपे नव्हते, परंतु मी पुढे जात राहिलो, कारण काहीही अशक्य नाही हे मला सिद्ध करायचे होते. माझ्या चुलतभावाच्या सोबतीने आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली, मी स्वतःवर विश्वास ठेवला आणि मांडवी नदी पार केली. मला आता याहून मोठ्या नद्या पोहून पार करायच्या आहेत. अधिक नद्या पोहायचे आहेत आणि इतर मुलांना दाखवायचे आहे, की अशक्य असे काहीही नसते.समावेशता, निर्धार आणि सामूहिक प्रयत्न या बाबींच्या जोरावर काहीही साध्य करता येते याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. पॅरा–ॲथलीट्स आणि दिव्यांग मुलांना सतत पाठबळ देत राहणे, त्यांच्या प्रयत्नांची योग्य दखल घेणे या बाबींचे महत्व या कामगिरीतून ठळकपणे अधोरेखित होते.


## Blue Coast Hotels Ltd.

**Regd. Office :** S-1, D-39, N-66, Phase IV, Verna Industrial Estate, Verna Goa-403722
**Corporate Identity Number :** L31200GA1992PLC003109

**Extract of Statement of Audited Consolidated Financial Results For the Quarter and Year ended on March 31, 2025** (₹in Lakhs, except per share data)

| Sl. No. | Particulars | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended | | | Year Ended | |
| | | 31.03.2025 (Audited) | 31.12.2024 (Unaudited) | 31.03.2024 (Audited) | 31.03.2025 (Audited) | 31.03.2024 (Audited) |
| 1 | Total Income from Operations | 2.64 | 7.41 | 27.46 | 45.06 | 63.28 |
| 2 | Net Profit for the period before Tax | (233.14) | (136.54) | (109.89) | 8,083.20 | (488.34) |
| 3 | Net Profit for the period after Tax | (316.74) | (136.54) | (353.44) | 7,999.60 | (731.89) |
| 4 | Share of Minority interest in Profit/(Loss) | - | - | - | - | - |
| 5 | Net Profit after Minority Interest | (316.74) | (136.54) | (353.44) | 7,999.60 | (731.89) |
| 6 | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax) | (323.79) | (136.54) | (353.44) | 8,010.14 | (731.89) |
| 7 | Paid-up Equity Share Capital of Face Value of ₹10/- each | 1,464.05 | 1,464.05 | 1,274.85 | 1,464.05 | 1,274.85 |
| 8 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year. | - | - | - | (3,899.31) | (13,895.85) |
| 9 | Earning Per Share (in ₹) | | | | | |
| | - Basic | (2.21) | (1.07) | (2.77) | 59.47 | (5.74) |
| | - Diluted | (1.65) | (0.93) | (2.77) | 43.28 | (5.74) |

**Note:-**

A The above is an extract of the Quarterly Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Financial Results is available on the websites of Stock Exchanges i.e **www.bseindia.com** and **www.nseindia.com** and the Company' i.e **https://www.bluecoast.in/financial-results**

B The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.

Additional Information on Standalone financial results is as follows:-

(₹ in Lakhs)

| Sl. No. | Particulars | Quarter Ended | | | Year Ended | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.03.2025 (Audited) | 31.12.2024 (Unaudited) | 31.03.2024 (Audited) | 31.03.2025 (Audited) | 31.03.2024 (Audited) |
| 1 | Total Income from Operations | 2.64 | 6.81 | 27.46 | 45.06 | 63.28 |
| 2 | Net Profit for the period before Tax | (232.40) | (31.44) | (109.28) | 8,084.44 | (487.47) |
| 3 | Net Profit for the period after Tax | (316.00) | (31.44) | (352.83) | 8,000.84 | (731.02) |
| 4 | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax) | (328.05) | (31.67) | (352.83) | 8,006.38 | (731.02) |

\# - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules.

**Scan the QR code to view the full Financial Results**

**For and on behalf of the Board of Directors of Blue Coast Hotels Limited**

Sd/-

**(Kushal Suri)**
(Whole Time Director)

Place : New Delhi
Date : 22.05.2025